**CNR NO. MHSI09-000062-2026**

**Order in RCS No. 22 /2026**

---

## <u>आदेश नि.५ लगत</u>

दाव्याचे तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. वादीतर्फे वकील श्री.एल.एल.नाथगोसावी यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी असे कथन केले की, दावा मिळकत ही वडिलोपार्जित मिळकत आहे. प्रतिवादी क्र.१ हा दावा मिळकतीमध्ये बेकायदेशीर रित्या नवीन घराचे बांधकाम करत आहे. तरी, त्यांनी सदर बांधकाम करु नये असा त्यांचेविरुध्द मनाई आदेश पारित करावा.

दाव्याचे व अर्जाचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र.१ प्रस्तुत अर्ज का मंजूर करु नये याची कारणे दाखवा नोटीस पाठविणेत यावी. तसेच, स्पेशल बेलिफ मागणी केली असल्यास ती मान्य करणेत येते. तसेच, वादी व प्रतिवादी क्र.१ यांनी पुढील तारेख पर्यंत दावा मिळकती मध्ये ' जैसे थे ' परिस्थिती ठेवावी.

16/2/26

( Shrikant S. Pachandi)
Civil Judge Junior Division,
Deogad.

Date : 16/02/2026